## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०५ / २०१९.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०५ / ०३ /२०१९.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५, शुक्रवार दिनांक ०८/ ०३ /२०१९.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती..........................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक ०८/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ५ शुक्रवार दिनांक ०८ / ०३ / २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे होणा-या **विशेष सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १५ | प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत नालेगांव स.नं.४१/१,४३/३ येथे २१६ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत..<br>संदर्भ :- १) मा.महासभा क्रमांक ४ दिनांक १४/०६/२०१६ अन्वये मंजूरी.<br>२) मा.CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ अन्वयेच्या बैठकीमध्ये प्राप्त मंजूरी. |
| १६ | प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत केडगांव स.नं.२०६/१अ, येथे ६२४ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत.<br>संदर्भ :- १) मा.महासभा क्रमांक ४ दिनांक १४/०६/२०१६ अन्वये मंजूरी.<br>२) मा.CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ अन्वयेच्या बैठकीमध्ये प्राप्त मंजूरी. |
| १७ | अहमदनगर शहरातुन जाणा-या कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२) या रस्त्यावर उड्डाणपुल बांधणेसाठी भुसंपादन करणे कामी कलम ३७ अन्वये मंजुर विकास योजनेत रस्ता रुंदीकरण दर्शविणे बाबत कार्यवाही करणे बाबत... |
| १८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०५ / ०३ /२०१९.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक :- १५** **दिनांक : ०८ /०३ /२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत नालेगांव स.नं.४१/१,४३/३ येथे २१६ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत..

संदर्भ :- १) मा.महासभा क्रमांक ४ दिनांक १४/०६/२०१६ अन्वये मंजूरी.

२) मा.CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ अन्वयेच्या बैठकीमध्ये प्राप्त मंजूरी.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत नालेगांव स.नं ४१/१,४३/३ येथे २१६ सदनिका मुलभुत सुविंधासह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास मा. CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ च्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार मंजुर झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | प्रकल्पाचे नावनालेगांव स.नं ४१/१,४३/३ येथे प्रधानमंत्री आवास योजना राबविणे. |
| २ | घटक - भागीदारी तत्वावर परवडणारी घरे |
| ३ | एकुण सदनिका-२१६ |
| ४ | मुलभुत सुविधा- अंतर्गत रस्ते, जल वाहिनी, संरक्षण भिंत,ड्रेनेज लाईन, पाण्याची टाकी,विद्युत व्यवस्था (ट्रान्सफॉर्मरसह ) व मलनिसारण प्रकल्प. |
| ४ | प्रति सदनिकेचे क्षेत्रफळ (कारपेट एरिया)-३० चौ.मी. |
| ५ | प्रकल्पाची रक्कम -१९.४७ कोटी |
| ६ | प्रति सदनिकाची रक्कम - ९.०१ लक्ष |
| ७ | मा. केंद्र व राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी प्राप्त होणारे अनुदान-२.५लक्ष |
| ८ | मा. केंद्र व राज्य शासन हिस्सा वगळता प्रति लाभार्थी सदनिकेसाठी भरावयाचा हिस्सा - ६.५१ लक्ष |

सदरचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आले होते. सदर प्रकल्पाकरीता मनपा मार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्प मा.शासनाकडेस मंजुरीसाठी सादर करतेवेळेस सन २०१७-१८ चा डिएसआर अस्तित्वात होता. तदनंतर सप्टेंबर २०१८ पासून सन २०१८-१९ चा डिएसआर लागु झाला आहे व त्यामधील दरामध्ये सन २०१७-१८ पेक्षा १२ ते १४ % पर्यंत वाढ झालेली आहे. त्यानुसार सुधारीत डिएसआर नुसार सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. तांत्रिक मान्यतानुसार खालील प्रमाणे प्रकल्पाच्या रक्कमेमध्ये बदल होत आहे.

| अ.क्र. | तपशिल | सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या डिपीआर नुसार रक्कमेबाबत तपशिल. | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या डिपीआर नुसार रक्कमेबाबत तपशिल. |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाची रक्कम | १९.४७ कोटी | २१.३७ कोटी |
| २ | प्रति सदनिका रक्कम | ९.०१ लक्ष | ९.९०लक्ष |
| ३ | मा. केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान | २.५ लक्ष | २.५ लक्ष |
| ४ | मा. केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान वगळता लाभार्थी हिस्सा | ६.५१ लक्ष | ७.४० लक्ष |

त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रति सदनिका रक्कम रु. ९.९० लक्ष इतकी येत असून लाभार्थी हिस्सा रक्कम रु. ७.४० लक्ष इतका येत आहे व सुधारीत अंदाजपत्रकानुसार लाभार्थी हिश्शामध्ये रक्कम रु. ०.८९ लक्ष रक्कमेची वाढ होत आहे.

सदर बाबत सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल फेर मान्यतेस्तव मा. राज्यस्तरीय मुल्यमापन समितीकडेस सादर करण्यात आला. दिनांक २३/०१/२०१९ रोजी गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे मा . अप्पर मुख्य सचिव यांचे दालनामध्ये SLACची बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. अतिरिक्त आयुक्त, उप अभियंता, प्रकल्प विभाग व मनपाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार उपस्थितीत होते. सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत मा.अप्पर मुख्य सचिव यांनी मनपाने सादर केलेल्या प्रस्तावास CSMC कडे सादर करण्याची आवश्यकता नाही असे सुचीत केले व सदरच्या सुधारीत प्रकल्प अहवालास म. न.पा. स्तरावर सुधारीत मान्यता घेवुन निविदा मागविणे बाबत कार्यवाही करणे बाबत सुचीत केले.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत भागिदारी तत्वावर परवडणारी घरे या घटकांतर्गत विहित नमुन्यामध्ये इच्छुक मनपा हद्दीतील नागरीकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. यामध्ये एकुण AHP या घटकामध्ये ११९०५ अर्ज प्राप्त झाले आहेत. सुधारीत अंदाजपत्रकानुसार निविदा मागवुन दर निश्चित झाल्यानंतर नागरीकांकडुन प्राप्त झालेल्या अर्जामधुन सदनिका बाबत ड्रॉ काढण्यात येणार आहे. ड्रॉ काढण्यापुर्वी प्रति सदनिका रक्कम व शासन अनुदान वगळता येणारा लाभार्थी हिस्सा रक्कम निश्चित होणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प विकसीत करणे करीता मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नाही.

तरी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत नालेगांव स.नं ४१/१, ४३/३ येथे २१६ सदनिका मुलभुत सुविंधासह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत व त्यानुसार प्रकल्प विकसीत करणे करीता एजन्सीची नियुक्ती करणे करीता ई-निविदा मागविणे बाबत मंजुरी प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सन २०१८-१९ चे जिल्हा दरसूची नुसार प्रकल्पाचे किमतीमध्ये वाढ होत असलेने वाढीव किंमतीस मा.महासभेचे मंजूरीची आवश्यकता आहे. करिता सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मुळ प्रस्तावातील पेज नं. p-१ वर प्रकल्पाची किंमत १९.४७ कोटी इतकी असुन प्रति सदनिका ९.०१ लक्ष असुन सुधारित प्रकल्पात किंमत २१.३७ कोटी असुन प्रति सदनिका ९.९० लक्ष p-२० असुन सुधारित प्रकल्पाच्या वाढीव किमतीमुळे लाभार्थी हिस्सात ०.८९ लक्ष वाढ दिसुन येते. त्यामुळे सुधारित वाढीव हिस्साच्या रक्कमेबाबत जाहीर प्रगटन लाभार्थींना कळविणे योग्य वाटते सुधारित DSR ची प्राप्त कधी प्रापत याबाबत टिप्पणीत उल्लेख नाही.

p-१ करीता मुळ प्रकल्प १९.४७ कोटी यास यापुर्वी मा.महासभेची मान्यता घेतली किंवा कसे याचा बोध होत नाही. रात्य स्तरीय मुल्य मापन समिती दि.२३/०१/२०१९ झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सोबत नाही. AHP या प्रकल्पास यापुर्वी तांत्रिक मान्यता राज्य स्तरीय मुल्य मापन समितीस दिली. असुन सुधारीत मान्यता बाबत विभागाने खात्री करावी. विभागाने खात्री करुन उचित निर्णय घ्यावा.

यावर उप अभियंता प्रकल्प विभाग यांचेकडुन फेर सादर रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजने बाबत मा.महासभा ठराव क्र.४ दिनांक १४/११/२०१६ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार नालेगांव स.नं.४१/१, ४३/३ या ठिकाणी AHP घटकांतर्गत २१६ सदनिकांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मा.शासनाकडेस सादर करण्यात आला. त्यानुसार सदर प्रस्तावास मा.शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार प्रति सदनिका रक्कमेमध्ये होणारी वाढ ही लाभार्थ्यांकडुन घेण्यात येणार आहे. अहमदनगर महानगरपालिकेस प्रकल्प उभारणी करीता कुठलाही आर्थिक हिस्सा भरावा लागणार नाही. त्यानुसार वाढीव खर्चास मान्यता घेणे बाबत प्रस्ताव मा.महासभेकडेस सविनय सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र. T-१ वरील 'अ' नुसार दिलल्या तोंडी सुचनेनुसार 'ब' नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवाला मधिल पान क्र. T-१ ते T-३ प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

विषय क्रमांक १५ चे वाचन करण्यांत आले.

**मा.महापौर साहेब :-** मेहेत्रे माहिती द्या.

श्री.मेहेत्रे :- नालेगांव स.नं.४१/१, ४३/३ येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत २१६ सदनिका मुलभुत सुविधासह विकसीत करणे बाबतच्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणेसाठी हा विषय घेण्यात आला

आहे. या प्रकल्पाची मुळ किंमत १९.४७ कोटी असून सदरचे अंदाजपत्रक सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यांत आले होते. सदर प्रकल्पाकरीता महानगरपालिके मार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यांत आली आहे. सदर प्रकल्प मा.शासनाकडेस मंजुरीसाठी सादर करतेवेळेस सन २०१७-२०१८ चा विकासभार अस्तीत्वात होता. तद्नंतर सप्टेंबर २०१८ पासुन सन २०१८-२०१९ चा विकास भार लागू झाला आहे व त्यामधील दरामध्ये सन २०१७-२०१८ पेक्षा १२ ते १४.१ पर्यंत वाढ झालेली आहे. त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. तांत्रिक मान्यतेनुसार प्रति सदनिका रक्कम रु.९.९० लक्ष इतकी येत असून प्रति लाभार्थी हिस्सा रक्कम रु.७.७० लक्ष इतका येत आहे. व सुधारीत अंदाजपत्रकानुसार लाभार्थी हिश्यामध्ये रक्कम रु.०.८९ लक्ष रक्कमेची वाढ होत आहे. मा.केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणासरे अनुदान रु.२.५ लक्ष मिळणार आहे. व लाभार्थ्यांस लोनची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

मा.श्री.दत्ता कावरे :- मोकाट कुत्र्याचे बंदोबस्तासाठी एक सक्षम अधिकारी नेमून महानगरपालिकेची स्वतःची टिम तयार करावी हा प्रश्न गांभीर्याने घेण्यात यावा.

मा.महापौर साहेब :- आयुक्त साहेब यासाठी वेगळी टिम नेमणार आहेत. कालच नाविन्यपूर्ण योजनेत १५.११ लक्ष मंजूर झाले आहे. त्यावर पुन्हा आढावा घेवून कामात सुधारणा करण्यात येईल.

मा.श्री.योगीराज गाडे :- महिला दिनाच्या सर्व महिला सदस्यांना हार्दिक शुभेच्छा महिलांसाठी स्वतंत्र जॉगींग ट्रॅकसाठी स्वतंत्र जागेची मागणी केली आहे. सिध्दीबागेजवळ जॉगींग ट्रॅक आहे परंतु तेथे अडचणी आहेत.

मा.महापौर साहेब :- नगररचना विभागाला सांगून जागा उपलब्ध करुन घेवू अजेंडयावरील विषय घेवू द्या.

मा.श्री.कुमार वाकळे :- हा विषय मंजूर करा.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. .

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत नालेगांव स.नं.४१/१,४३/३ येथे २१६ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शिंदे स्वप्नील रोहीदास

अनुमोदक :- मा.श्री.वाकळे कुमार बबन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक :- १६** **दिनांक : ०८/०३/२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत केडगांव स.नं.२०६/१अ, येथे ६२४ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत.

संदर्भ :- १) मा.महासभा क्रमांक ४ दिनांक १४/०६/२०१६ अन्वये मंजूरी.

२) मा.CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ अन्वयेच्या बैठकीमध्ये प्राप्त मंजूरी.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत केडगांव स.नं.२०६/१अ,येथे ६२४ सदनिका मुलभुत सुविंधासह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास मा. CSMC च्या दिनांक २७ एप्रिल २०१८ च्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार मंजुर झालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | प्रकल्पाचे नाव- केडगांव स.नं.२०६/१अ येथे प्रधानमंत्री आवास योजना राबविणे. |
| २ | घटक - भागीदारी तत्वावर परवडणारी घरे |
| ३ | एकुण सदनिका-६२४ |
| ४ | मुलभुत सुविधा- अंतर्गत रस्ते, जल वाहिनी, संरक्षण भिंत,ड्रेनेज लाईन, पाण्याची टाकी,विद्युत व्यवस्था (ट्रान्सफॉर्मरसह ) व मलनिसारण प्रकल्प. |
| ४ | प्रति सदनिकेचे क्षेत्रफळ (कारपेट एरिया)-३० चौ.मी. |
| ५ | प्रकल्पाची रक्कम -४६.३२ कोटी |
| ६ | प्रति सदनिकाची रक्कम -७.४२ लक्ष |
| ७ | मा. केंद्र व राज्य शासनाकडून प्रति लाभार्थी प्राप्त होणारे अनुदान-२.५लक्ष |
| ८ | मा. केंद्र व राज्य शासन हिस्सा वगळता प्रति लाभार्थी सदनिकेसाठी भरावयाचा हिस्सा -४.९२ लक्ष |

सदरचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आले होते. सदर प्रकल्पाकरीता मनपा मार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्प मा.शासनाकडेस मंजुरीसाठी सादर करतेवेळेस सन २०१७-१८ चा डिएसआर अस्तित्वात होता. तदनंतर सप्टेंबर २०१८ पासून सन २०१८-१९ चा डिएसआर लागु झाला आहे व त्यामधील दरामध्ये सन २०१७-१८ पेक्षा १२ ते १४ % पर्यंत वाढ झालेली आहे. त्यानुसार सुधारीत डिएसआर नुसार सविस्तर अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. तांत्रिक मान्यतानुसार खालील प्रमाणे प्रकल्पाच्या रक्कमेमध्ये बदल होत आहे.

| अ.क्र. | तपशिल | सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या डिपीआर नुसार रक्कमेबाबत तपशिल. | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या डिपीआर नुसार रक्कमेबाबत तपशिल. |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्पाची रक्कम | ४६.३२ कोटी | ५५.८१ कोटी |
| २ | प्रति सदनिका रक्कम | ७.४२लक्ष | ८.९४लक्ष |
| ३ | मा. केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान | २.५ लक्ष | २.५ लक्ष |
| ४ | मा. केंद्र व राज्य शासनाकडुन प्राप्त होणारे अनुदान वगळता लाभार्थी हिस्सा | ४.९२ लक्ष | ६.४४ लक्ष |

त्यानुसार सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रति सदनिका रक्कम रु. ८.९४ लक्ष इतकी येत असून लाभार्थी हिस्सा रक्कम रु. ६.४४ लक्ष इतका येत आहे व सुधारीत अंदाजपत्रकानुसार लाभार्थी हिश्शामध्ये रक्कम रु. १.५२ लक्ष रक्कमेची वाढ होत आहे.

सदर बाबत सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल फेर मान्यतेस्तव मा. राज्यस्तरीय मुल्यमापन समितीकडेस सादर करण्यात आला. दिनांक २३/०१/२०१९ रोजी गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे मा . अप्पर मुख्य सचिव यांचे दालनामध्ये SLACची बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. अतिरिक्त आयुक्त, उप अभियंता, प्रकल्प विभाग व मनपाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार उपस्थितीत होते. सुधारीत अंदाजपत्रकानुसार तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत मा.अप्पर मुख्य सचिव यांनी मनपाने सादर केलेल्या प्रस्तावास CSMC कडे सादर करण्याची आवश्यकता नाही असे सुचीत केले व सदरच्या सुधारीत प्रकल्प अहवालास म. न.पा. स्तरावर सुधारीत मान्यता घेवुन निविदा मागविणे बाबत कार्यवाही करणे बाबत सुचीत केले.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत भागिदारी तत्वावर परवडणारी घरे या घटकांतर्गत विहित नमुन्यामध्ये इच्छुक मनपा हद्दीतील नागरीकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. यामध्ये एकुण AHP या घटकामध्ये ११११०५ अर्ज प्राप्त झाले आहेत. सुधारीत अंदाजपत्रकानुसार निविदा मागवुन दर निश्चित झाल्यानंतर नागरीकांकडुन प्राप्त झालेल्या अर्जामधुन सदनिका बाबत ड्रॉ काढण्यात येणार आहे. ड्रॉ काढण्यापुर्वी प्रति सदनिका रक्कम व शासन अनुदान वगळता येणारा लाभार्थी हिस्सा रक्कम निश्चित होणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प विकसीत करणे करीता मनपावर कुठलाही आर्थिक भार येणार नाही.

तरी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत केडगांव स.नं.२०६/१अ,येथे ६२४ सदनिका मुलभुत सुविंधासह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता घेणे बाबत व त्यानुसार प्रकल्प विकसीत करणे करीता एजन्सीची नियुक्ती करणे

करीता ई-निविदा मागविणे बाबत मंजुरी प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सन २०१८-२०१९ चे जिल्हा दरसूचीनुसार प्रकल्पाचे किमतीत वाढ होत असलेने सुधारित किंमतीस मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मुळ प्रस्तावातील पृष्ठ क्र.p-१ वरिल प्रकल्पाची किंमत रु.४६.३२ कोटी व प्रति सदनिका ७.४२ लक्ष इतकी होती. सुधारित प्रकल्पाची किंमत रु.५५.८१ कोटी व प्रति सदनिका किंमत ८.९४ लक्ष p-७ वर आहे. सुधारित प्रकल्पाच्या वाढीव किंमती मुळे लाभार्थींच्या हिस्सात १.५२ लक्ष वाढ दिसुन येते त्यामुळे सुधारित वाढीव फरकाच्या रक्कमे बाबत लाभार्थींना जाहीर प्रगटण करणे आवश्यक वाटते.

सुधारीत DSR ची प्रत कधील प्राप्त झाली याबाबत टिप्पणी अभिप्राय नाहीत. p-१ वरील मुळ प्रकल्प ४६.३२ कोटीला मा.महासभेची मान्यता घेतली किंवा कसे चा बोध होत नाही. राज्यस्तरीय मुल्यमापन समिती झालेल्या दि.२३/१/२०१९ बैठकीचे इतिवृत्त सोबत नाही. राज्य स्तरिय मुल्यमापन समितीची (AHP) प्रकल्पाला मान्यता घेतली असुन विभागाने खात्री करुन उचित निर्णय घ्यावा. सुधारित मान्यता बाबत विभागाने खात्री करावी.

यावर उप अभियंता, प्रकल्प विभाग यांचा फेर सादर अभिप्राय की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये प्रधानमंत्री आवास योजने बाबत मा.महासभा ठराव क्र. ४ दिनांक १४/११/२०१६ अन्वये मान्यता घेण्यात आलेला आहे. त्यानुसार केडगांव स.नं.२०६/१ अ या ठिकाणी AHP घटकांतर्गत ६२४ सदनिकांचा सविस्तर प्रकल्प अहवाल मा.शासनाकडेस सादर करण्यात आला. त्यानुसार सदर प्रस्तावास मा.शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. सुधारीत अंदाजपत्रकानुसार प्रति सदनिका रक्कमेमध्ये होणारी वाढ ही लाभार्थ्यांकडून घेण्यात येणार आहे. अहमदनगर महानगरपालिकेस प्रकल्प उभारणी करीता कुठलाही आर्थिक हिस्सा भरावा लागणार नाही. त्यानुसार वाढीव खर्चास मान्यता घेणे बाबत प्रस्ताव मा.महासभेकडेस सविनय सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र.T-२ वरील 'अ' मध्ये दिलेल्या तोंडी सुचनेनुसार 'ब' नुसार मान्यतेस्तव सादर

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील पान क्र. T-१ ते T-३ प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

विषय क्रमांक १६ चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.कुमार वाकळे :- विषय मंजूर करा.

मा.महापौर साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका मार्फत केडगांव स.नं.२०६/१अ, येथे ६२४ सदनिका मुलभूत सुविधांसह विकसीत करणे बाबतच्या प्रस्तावास सुधारीत अंदाजपत्रकानुसार मान्यता देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.शिंदे स्वप्नील रोहिदास

अनुमोदक :- मा.श्री.वाकळे कुमार बबन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक :-  १७** **दिनांक :  ०८/०३/२०१९.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातुन जाणा-या कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२) या रस्त्यावर उड्डाणपुल बांधणेसाठी भुसंपादन करणे कामी कलम ३७ अन्वये मंजुर विकास योजनेत रस्ता रुंदीकरण दर्शविणे बाबत कार्यवाही करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :- १)** मा.महासभा ठराव क्र.०७ दिनांक ०२/०८/२०१८ अन्वये दिलेली मंजुरी.

**२)** विषयांकित फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.२३/१०/२०१८ रोजी दिलेली प्रसिध्दी.

**३)** विषयांकित फेरबदल प्रस्तावाबाबत आलेल्या हरकतींवर दि.२५/०१/२०१९ रोजी घेतलेली सुनावणी.

अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर हद्दीतुन जाणा-या कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२) या रस्त्यावरील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी उड्डाणपुलाचे बांधकाम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत करण्यात येणार आहे. तसेच या प्राधिकरणा मार्फत उड्डाणपुलाची आखणी सेवा रस्त्यासह करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सदरचे रस्ता रुंदीकरण अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत दर्शविणेसाठी मा.महासभा ठराव क्र.७ दिनांक ०२/०८/२०१८ अन्वये खालील प्रमाणे मंजुरी देण्यात आलेली आहे.

१) उड्डाणपुलासाठी आवश्यक असणारी जागा मंजुर विकास योजनेत दर्शविणे बाबत फेरबदल करणेस मंजूरी दिलेली आहे.

२) दि.०४/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यानंतर अद्ययावत होणा-या शासन निर्णयानुसार उड्डाण पुलासाठी आवश्यक असणारी खाजगी जागा, शासकीय जागा, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास हस्तांतरीत करणेसाठी येणा-या खर्चास महासभेने मंजुरी दिलेली आहे.

३) तसेच भुसंपादनासाठी टी.डी.आर. चा वापर करणेस महासभेने मंजुरी दिलेली आहे. व उड्डाणपुल बांधकामा नंतर वसुल करण्यात येणा-या टोलच्या उत्पन्नातील काही हिस्सा महानगरपालिकेस मिळणेच्या दृष्टीने प्रशासनाने योग्य तो प्रस्ताव शासनाकडे सादर करणे बाबत महासभेने सुचीत केलेले आहे.

मा.महासभेने मंजुर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये पुढील प्रमाणे फेरबदलाबाबत प्राथमिक कार्यवाही करणेत आलेली आहे.

१) सदर फेरबदल प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.२३/१०/२०१८ प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.

२) सदर फेरबदल प्रस्तावाचा इंग्रजी व मराठी मसुदा स्थानिक वर्तमान पत्रात दि.२४/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे. व विहित ३० दिवसांच्या नागरिकांच्या हरकती/सूचना मागविणेत आलेल्या आहेत.

३) प्राप्त झालेल्या एकुण १७ नागरिकांच्या हरकती/सुचना वर दि.२५/०१/२०१९ रोजी सुनावणी घेण्यात आलेली, सुनावणी बाबतचा तक्ता सोबत सादर केलेला आहे. तसेच उड्डाणपुलाच्या बांधकामाने बाधित होणा-या जमीन धारक यांना बाधित जागेच्या मोबदला स्वरुपात हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) घेणे

बाबत समुपदेशन / मार्गदर्शन करणेसाठी जागा मालक यांची बैठकही सदर दिवशी घेवुन त्यांना टी.डी.आर घेणे बाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

४) मा.महासभेने दिलेल्या मंजूरी नुसार उड्डाणपुल बांधकामानंतर वसुल करण्यांत येणा-या टोल रकमेचा काही हिस्सा महानगरपालिकेस मिळणे बाबत करण्यात येणा-या कार्यवाही बाबत शक्य तितके लवकर इकडेस अवगत करणे बाबत मा.प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेकडे जा.क्र.३०९ दि.१८/०१/२०१९ रोजी पत्र देण्यात आलेले आहे.

आता उक्त प्रस्तावा बाबत महानगरपालिकेच्या अभिप्रायासह कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मा.महासभेकडे सदर प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल.

सोबत :- आलेल्या हरकती सुनावणी बाबत तक्ता.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

विषय क्रमांक १७ चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- विषय मंजूर करण्यांत यावा.

मा.महापौर साहेब :- या कामासाठी शासन १००% निधी उपलब्ध करुन देणार आहे. त्यामुळे हा विषय मंजूर करण्यात यावा.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातुन जाणा-या कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२) या रस्त्यावर उड्डाणपुल बांधणेसाठी भुसंपादन करणे कामी कलम ३७ अन्वये मंजुर विकास योजनेत रस्ता रुंदीकरण दर्शविणे बाबत कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदरचा फेरबदलाचा प्रस्ताव प्रशासनाने मा.शासनाकडेस मंजूरीकरीता पाठविणे बाबतची कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेस काही उत्पन्न मिळणेच्या दृष्टीने पुलाखालील जागेत पार्किंग, सुलभ शौचालय आदी व्यवस्था करुन महानगरपालिकेचा हक्क राहील यादृष्टीने कार्यवाही करावी. तसेच पुल बांधुन झाल्यानंतर टोल नाक्यापासुन मिळणा-या उत्पन्नातुन महानगरपालिकेस काही हिस्सा मिळणेच्या दृष्टीने देखील प्रशासनाने कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.शिंदे स्वप्नील रोहिदास

अनुमोदक :- मा.श्री.वाकळे कुमार बबन

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.